# दोडामार्ग कॉलेजात मुंबई विद्यापीठ कार्यशाळा

## जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील ७० विद्यार्थ्यांचा सहभाग

वार्ताहर
झरेबांबर

मुंबई विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे घेण्यात येणारी जिल्हास्तरीय कार्यशाळा येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात नुकतीच झाली. ५१ व्या युवा महोत्सवात घेण्यात येणाऱ्या विविध कलाप्रकाराची विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना माहिती व्हावी, नियमांची माहिती व्हावी व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सहभागी होऊन आपले कला गुण विकसित करावे, यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांसाठी या कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेसाठी मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक विभाग समन्वयक डॉ. नीलेश सावे, जिल्हा समन्वयक डॉ. आशिष नाईक, विजय जाधव, अमोल बावकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन दोडामार्ग नगराध्यक्षा सौ. लीना कुबल यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातून एकूण सत्तर जणांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. प्रशांत ढेपे यांनी तर आभार प्रा. श्रीपाद पाडगावकर यांनी मानले.



**दोडामार्ग : नगराध्यक्ष सौ. लीना कुबल यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील. बाजूला डॉ. नीलेश सावे, डॉ. आशिष नाईक व इतर.** समीर ठाकुर